दिव्य मराठी

शिक्षण दर्जा • नाशिकमधील आठ महाविद्यालयांचा समावेश

# राज्यातील ४९ महाविद्यालयांना नॅकच्या मूल्यांकनात मानांकन

गणेश डेमसे | नाशिक

विद्यापीठ अनुदान आयोगातर्फे (यूजीसी) राष्ट्रीय मूल्यांकन आणि प्रत्यायन परिषद या स्वायत्त संस्थेतर्फे देशभरातील महाविद्यालयांचे मूल्यांकन केले जाते. नॅक समितीद्वारे फेब्रुवारी व मार्च महिन्यात करण्यात आलेल्या मूल्यांकनामध्ये यंदा नाशिकच्या आठ महाविद्यालयांसह राज्यातील एकूण ४९ महाविद्यालयांना वेगवेगळ्या श्रेणी प्राप्त झाल्या आहेत. नॅकच्या नवीन पद्धतीद्वारे करण्यात आलेल्या मूल्यांकनामध्ये इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रातील सर्वाधिक महाविद्यालयांचा समावेश असल्याने उच्च शिक्षणाच्या दिशेने हे महत्त्वाचे पाऊल ठरले आहे.

यूजीसीतर्फे राष्ट्रीय मूल्यांकन व प्रत्यायन परिषद (नॅक) या स्वतंत्र संस्थेतर्फे देशभरातील महाविद्यालयांची तपासणी (मूल्यांकन) व श्रेणी वाटप केले जाते. नॅकची श्रेणी मिळवण्यासाठी महाविद्यालयांना प्रस्ताव पाठवावे लागतात. नॅकने ठरवून दिलेल्या निकषांची पूर्तता केल्याची तपासणी करण्यासाठी समितीही येत असते. या समितीकडून मूल्यांकन झाल्यानंतरच महाविद्यालयांना श्रेणी मिळते. नॅकने ८ फेब्रुवारी व ४ मार्च रोजी जाहीर केलेल्या निकालात मूल्यांकन झालेल्या महाविद्यालयांची यादी संकेतस्थळावर जाहीर केली आहे. त्यात महाराष्ट्रातील ४९ महाविद्यालयांना वेगवेगळ्या श्रेणी प्राप्त झाल्या आहेत. आयसीटी या नवीन पद्धतीसार दुसऱ्यांदा नॅकचे मानांकन जाहीर झाले आहे. विद्यापीठाच्या नवीन सूचनांनुसार सर्वच महाविद्यालयांना नॅकचे मूल्यांकन करणे अनिवार्य केले आहे. नॅक संस्थेने ३१ मार्च २०१७ नंतर कोणत्याही प्रकारचे प्रस्ताव स्वीकारलेले नाही. जुलै २०१७ पासून नॅकची नवीन प्रणाली विकसित करण्यात आली आहे. इन्फर्मेशन कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी (आयसीटी) या पद्धतीने ७० टक्के, ऑनलाइन तर ३० टक्के समितीद्वारे प्रत्यक्ष महाविद्यालयांची तपासणी करण्यात आली असून सध्या काटकोर व पारदर्शकपणे मूल्यांकन केले जात आहे.

## एपीटी, गुरूगोविंद सिंग अभियांत्रिकीला मानांकन

मविप्र संस्थेचे इगतपुरी येथील महाविद्यालयास बी, डॉ. मुंजे इन्स्टिट्यूटला बी+, डांग सेवा मंडळ संचलित महाविद्यालय अभोणा सी, पेठ येथील दादासाहेब बीडकर महाविद्यालयास बी, नवजीवन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट बी++, एचपीटी कॉलेजला ए, एसएमआरके महाविद्यालयास बी++ तर गुरूगोविंद सिंग अभियांत्रिकी महाविद्यालयास बी+ श्रेणी प्राप्त झाली आहे.

**Divya Marathi, 7th Apr 2019**